पुढारी

# संगणकतज्ज्ञ डॉ. सहस्त्रबुद्धे यांचे आज व्याख्यान

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या संगणकशास्त्र विभागात डॉ. एम. एम. प्रसाद व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे. यानिमित्त प्रसिद्ध संगणकतज्ज्ञ डॉ. हरी सहस्त्रबुद्धे यांचे मंगळवार (दि. ११) सकाळी ११ वाजता व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे.


डॉ. सहस्त्रबुद्धे हे अल्गोरीदमचे तज्ज्ञ म्हणून ओळखले जातात. यावेळी ते 'संगणक शास्त्रातील स्थायी मूल्यांचे योगदान' या विषयावर व्याख्यान देणार आहेत. याप्रसंगी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांची यावेळी उपस्थिती असणार आहे.

लोकमत

# हरी सहस्त्रबुद्धे यांचे आज व्याख्यान

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** संगणकशास्त्रज्ञ डॉ. हरी सहस्त्रबुद्धे हे आज, मंगळवारी शिवाजी विद्यापीठाच्या संगणकशास्त्र अधिविभागात डॉ. एम. एस. प्रसाद गौरव व्याख्यानमालेचे चौथे पुष्प गुंफणार आहेत. पार्किन्सनसारख्या रोगांनी पीडितांच्या मदतीसाठी ऑटोमेशन यावर ते संशोधन करत आहेत. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या अध्यक्षतेखालील व्याख्यानात डॉ. सहस्त्रबुद्धे 'संगणक शास्त्रातील स्थायी मूल्यांचे योगदान'वर व्याख्यान देतील, अशी माहिती संगणकशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. आर. के. कामत यांनी दिली.



Hello Kolhapur
Page No. 2 Sep 11, 2018
Powered by: erelego.com

पुढारी

# शिवाजी विद्यापीठाच्या ‘रा. से. योजने’ अंतर्गत गगनबावडा दत्तक

**गगनबावडा** : शिवाजी विद्यापीठ व पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव महाविद्यालय गगनबावडा, ग्रामपंचायत गगनबावडा यांच्या वतीने संयुक्तपणे केंद्र शासनाच्या उन्नत भारत योजनेंतर्गत गगनबावडा हे गाव शिवाजी विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेंतर्गत दत्तक गाव म्हणून निवडण्यात आले आहे. या योजनेंतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती देण्याकरिता महाविद्यालयात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीसाठी विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. डी. के. गायकवाड, शिवाजी विद्यापीठ सेवक संघाचे अध्यक्ष बाबा सावंत, आनंदी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष प्रा. सतीश देसाई व सचिव प्रा. डॉ. विद्या देसाई, प्राचार्य डॉ. एन. व्ही. शहा, सरपंच सौ. ज्योती घाटगेआदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 SEP 2018
तरूण भारत

# नेत्रदानाचा संकल्प करून मृत्युंजय बना

प्रतिनिधी

कोल्हापूर

नेत्रदानाचा संकल्प करून मृत्युनंतरही मृत्युंजय बनण्यासाठी समाजामध्ये जागृती होणे आवश्यक आहे, असे मत राजर्षी छत्रपती शाहू गव्हर्मेंट मेडिकलचे डॉ. अभिजीत ढवळे यांनी केले. विद्यापीठातील प्राणीशास्त्र अधिविभागामध्ये राष्ट्रीय नेत्रदान पंधरवडा निमित्त कार्यकमात ते बोलत होते.

डॉ. ढवळे म्हणाले, समाजातील प्रत्येक घटकांने नेत्रदानासारख्या राष्ट्रीय कर्तव्य भावनेने आणि निरपेक्षपणे सहभाग घेतल्याशिवाय या विधायक कार्याच्या प्रचाराला व प्रसाराला गती प्राप्त होणार नाही. कार्यक्रमात त्यांनी डोळयांची काळजी कशी घ्यावी, मुलांमधील बुबुळ अंधत्वाची कारणे, बुबुळ अंधत्व टाळण्यासाठी व बरे करण्यासाठींचे उपाय, नेत्रदान करण्याविषयी महत्वाच्या सूचना तसेच नेत्रदान मोहिमेत कसे सहभागी होता येईल, याची माहिती दिली. अनुप्रिता घोरपडे यांनी फॉर्म भरण्यासंबंधी मार्गदर्शन केले. प्राणीशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. व्ही. एस. मन्ने यांनी प्रास्ताविक केले. डॉ. एम. पी. भिलावे यांनी आभार मानले.विद्यार्थ्यांनी नेत्रदानाचे फॉर्म भरले. यावेळी डॉ. माधुरी वाळवेकर, डॉ. विनीता रानडे, डॉ. एस. आर. यंकची, डॉ. गायकवाड, डॉ. एन. ए. कांबळे, डॉ. ए. ए .देशमुख व डॉ. ए. डी. जाधव आदी उपस्थित होते.

**डॉ. अभिजित ढवळे यांचे मत**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
1 1 SEP 2018
Times of India

# Students to monitor noise levels during Ganpati immersion

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** Students from the Shivaji University's department of environmental sciences will be monitoring the noise level across the city on the last day of the Ganeshotsav on September 23.

Head of the department P D Raut said the department has a few noise measuring devices with the help of which the activity will be organised.

A team of five to six students will move around different parts of the city at different times on the day of visarjan. It will give us an idea about noise levels at different timings. It is a routine activity and usually work as a project for students," he said.

The monitoring will be done with the help of noise level meters, which record the sound. At fixed timings, a 10-minute reading is taken. Four such readings are taken in the interval of 60 minutes in a particular area and the readings are calculated.

The past few years' readings had shown that almost all areas that they had monitored crossed the sound limits permitted by the Maharashtra pollution control board.

Areas like Udyam nagar, Rajarampuri, Shahupuri, Laxmipuri and Mahadwar road consistently showed readings above 90 decibels during day and night in the past celebrations.

सकाळ

# डॉ. सहस्त्रबुद्धे यांचे आज व्याख्यान



हरी सहस्त्रबुद्धे

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या संगणकशास्त्र अधिविभागात डॉ. एम. एस. प्रसाद गौरव व्याख्यानमालेंतर्गत संगणकशास्त्रात जगभरात लौकिक असलेले डॉ. हरी सहस्त्रबुद्धे मंगळवारी (ता. ११) चौथे पुष्प गुंफणार आहेत. ते 'संगणकशास्त्रातील स्थायी मूल्यांचे योगदान' विषयावर मार्गदर्शन करतील. सकाळी अकराला व्याख्यानास सुरवात होईल. डॉ. सहस्त्रबुद्धे अल्गोरिदम तज्ज्ञ म्हणून ओळखले जातात. आयआयटी, कानपूर येथे १९६४ मध्ये पीएच. डी. मिळविल्यानंतर त्यांनी देशातील अनेक नामवंत विद्यापीठांत संगणकशास्त्राचा पाया रचला. कॉम्प्युटेशन, म्युझिओलॉजी ही नवीन संशोधन शाखा त्यांनी विकसित केली आहे.

Kolhapur, Main
11/09/2018 Page No. 102